सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षामध्ये विदर्भ गृहनिर्माण मंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या अंशदायी भविष्य निर्वाह निधीवरील व्याजाची रक्कम वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

गृहनिर्माण विभाग,

शासन निर्णय, क्रमांक : कॅशफ्लो-२०१८/प्र.क्र.५६/गृनिभू

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक : १५ मार्च, २०१९.

वाचा:-

शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, क्र.कॅशफ्लो-२०१७/प्र.क्र.३६/अर्थ-१, दि.१६.०४.२०१८.

शासन निर्णय :-

मागणी क्र.क्यु-१ मुख्यलेखाशिर्ष २०४९- व्याजप्रदाने, ०३ अल्पबचत भविष्य निर्वाह निधी इत्यादीवरील व्याज, १०४ राज्य भविष्य निर्वाह निधी वरील व्याज, इतर संकीर्ण भविष्य निर्वाह निधी (००) (०२) **विदर्भ गृहनिर्माण मंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या अंशदायी भविष्य निर्वाह निधीवरील व्याज** (२०४९ ०८५१) भारित ४५, व्याज या लेखाशिर्षाखाली वित्तीय वर्ष २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता रु.६७,४२,०००/- (रुपये सदुसष्ठ लक्ष बेचाळीस हजार फक्त) इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. वित्तीय वर्ष २०१८-२०१९ करीता खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली सदर रक्कम **पुस्तकी समायोजनाने** म्हाडास उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. वित्त नियंत्रक, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांनी उपलब्ध प्राप्त तरतूदीमधून अत्यंत आवश्यक व अनिवार्य खर्च करावा. तसेच मंजूर अनुदानापेक्षा सदर खर्च जास्त होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

३. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणामार्फत कोषागारात सादर होणाऱ्या देयकांवर या विभागाचे आहरण व संवितरण अधिकारी प्रतीस्वाक्षरी करतील.

४. या बाबीवर होणारा खर्च वरील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात येवून, तो २०१८-२०१९ या वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३१५१६४३३०२४०९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

Bharose M U

Digitally signed by Bharose M U
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Housing Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f3abf3ab8b16dfec487f18ce64d6b0ab8e38d8925d44d15f7dbd61babb4ae6df, serialNumber=8b015b0d7afaa0db7c0603c5c954e6816492dbb5f94ab286da7f224853a4eebf, cn=Bharose M U
Date: 2019.03.15 16:45:07 +05'30'

(मुं.उ.भरोसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.

२. महालेखाकार-१/२ (लेखा परिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
३. वित्त नियंत्रक, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
४. मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर-४४० ००१.
५. अवर सचिव तथा आहरण व संवितरण अधिकारी, (रोखशाखा) गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६. अवर सचिव, अर्थसंकल्प कार्यासन, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
९. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
१०.निवडनस्ती/ गृनिभू कार्यासन.